झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

दिनांक- 10 JUN 2019

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१-बी) अन्वये.**

## सूचना

**क्र.झोपुप्रा/नर/कार्या-१/फेरबदल/सिध्देश्वर तलाव-बगीचा/ठाणे/पाचपाखडी/२०१९/०४**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीबी-१२९७/१३१९/सीआर-१४८/९७/युडी-१२ दि.०४/१०/१९९९ अन्वये ठाणे शहराच्या विकास योजनेस मंजुरी दिलेली असून ती दि.१२ नोव्हेंबर, १९९९ पासून अंमलात आली आहे. ( यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधलेले )

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने अधिसूचना क्र.टिपीएस-१२७८/४१०६/नवि-५, दि.१८ जानेवारी, १९८५ अन्वये ठाणे शहराकरीता नगर रचना योजनेस मंजुरी दिलेली असून ती दि.१ मे, १९८५ पासून अंमलात आली आहे. (यापुढे "उक्त नगर रचना योजना" असे संबोधलेले )

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र. टिपीएस-१२९४/१२५९/सीआर/२२२/९४/युडी-१२, दि.२८ एप्रील, १९९५ अन्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रासाठी विकास नियंत्रण नियमावली मंजुर झालेली असुन ती दि.०१ जुन, १९९५ पासून अंमलात आलेली आहे. (यापुढे "उक्त नियमावली" असे संबोधलेले )

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुर्नविकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३(अ) मधील तरतुदीच्या अधीन राहून महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने दि. ०५डिसेंबर, २०१५ ची अधिसूचना क्र.झोपुयो/प्राधिकरण/ठाणे/योजना-१ (*महाराष्ट्र शासन राजपत्र,भाग दोन, मधील प्रसिध्दी सोमवार दिनांक-०७ डिसेंबर, २०१५*) अन्वये ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रासाठी "झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची" ( यापुढे उक्त प्राधिकरण असे संबोधलेले) नियुक्ती केलेली आहे.

आणि मंजुर नगर रचना योजना क्रमांक.०१ मधील अंतिम भुखंड क्र.४२३,४२४ व ४२७ हे भुखंड ठाणे शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार व मंजुर नगर रचना योजनेच्या प्रस्तावानुसार अस्तित्वातील "बगीचा" साठी आरक्षीत आहेत. (यापुढे "उक्त भुखंड" असे संबोधलेले )

आणि मंजुर नगर रचना योजना क्र.०१ मधील अंतिम भुखंड क्र.४२४अ हा भुखंड ठाणे शहराच्या मंजुर विकास योजनेनुसार व मंजुर नगर रचना योजनेच्या प्रस्तावानुसार अस्तित्वातील "तलाव" साठी आरक्षीत आहे. (यापुढे "उक्त तलाव" असे संबोधलेले )

आणि उक्त तलावातील झोपडयांचे पुनर्वसन उक्त भुखंडावर करण्याबाबत तयार असल्याबाबत लेखी आश्वासन संबधीत विकासक व संबधीत गृहनिर्माण संस्था अध्यक्ष यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास दिलेले आहे.

प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in